**JAMKHED MAHAVIDYALAYA, JAMKHED**
Dist. Ahmednagar (MS)

# जामखेड महाविद्यालयात आत्मनिर्भर करिअर ऑप्शन इन कॉमर्स या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**दिनांक 11 एप्रिल 2023**




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व दि पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे जामखेड महाविद्यालय, जामखेड IQAC व वाणिज्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने आत्मनिर्भर करिअर ऑप्शन्स इन कॉमर्स या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक 11 एप्रिल 2023 रोजी करण्यात आले होते, या कार्यक्रमाचे उद्घाटन, कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक सीए. राजेंद्र डांगे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डोंगरे एम एल, उपप्राचार्य डॉ.नरके एस वाय, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.काळे डी वाय, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. गोलाईत पी एस, मराठी विभाग प्रमुख डॉ.सुपेकर आर बी, व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सीए राजेंद्र डांगे यांनी विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकास करण्यासाठी DCC या सूत्राचा वापर करावा असे सांगितले, यातील Desire, Competence आणि Compassion विद्यार्थ्यांनी अंगीकृत करून आपला विकास करावा व आपले व महाविद्यालयाचे नाव राज्यात नव्हे

तर देशात गाजवावे असे विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले, सध्याच्या काळामध्ये खूप संधी उपलब्ध आहेत, या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवाव्यात असे आवाहनही त्यांनी प्राध्यापक वर्गास केले,

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डोंगरे एम एल यांनी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली तसेच महाविद्यालय विद्यार्थ्यांना विविध संधी उपलब्ध करून देण्यास नेहमीच प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही दिली व विद्यार्थ्यांनी अशा प्रकारच्या कार्यक्रमांमधून प्रेरणा घेऊन नवनवीन करियर निवडावे किंवा आपले स्वतःचे स्टार्टअप उभे करावे असे विद्यार्थ्यांना सांगितले, करियर निवडी संदर्भात किंवा स्टार्टअप सुरू करण्यासंदर्भात यापुढेही विद्यार्थ्यांच्या विविध कार्यशाळा घेण्यात येणार आहेत असे त्यांनी सांगितले, कार्यक्रमाच्या उत्तरार्धात मराठी विभाग प्रमुख डॉ.सुपेकर आर.बी. यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.काळे डी वाय, डॉ. राऊत एन बी व प्रा डोंगरे व्ही एस यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. देशमुख एच. एस. यांनी केले